मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – १४ जुलै २०१५

# मुंबई विद्यापीठ वर्धापन दिन व्याख्यान मालिका

मुंबई - मुंबई विद्यापीठाच्या १५९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून प्रथमच विद्यापीठ वर्धापन दिन व्याख्यानमालिका आयोजित करण्यात येणार आहे. या मालिकेतील पहिले पुष्प ज्येष्ठ पत्रकार आणि इतिहासतज्ज्ञ डॉ. अरुण टिकेकर गुंफणार आहेत. त्यांच्या व्याख्यानाचा विषय **“ मुंबई विद्यापीठाच्या सुरुवातीच्या इतिहासातील काही सार्वजनिक वाद”** हा आहे.

हा कार्यक्रम वर्धापन दिनाच्या पूर्व संध्येला म्हणजेच शुक्रवार दिनांक १७ जुलै २०१५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता सर कावसजी जहांगीर, दिक्षान्त सभागृह, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, येथे होईल.

वर्धापन दिन समारंभाचे औचित्य साधून विद्यापीठातील गुणवंत शिक्षकेत्तर सहका-यांचा मा. कुलगुरु डॉ. संजय देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

मुंबई विद्यापीठाची एक गौरवशाली परंपरा आहे. मुंबई विद्यापीठांने समाजाचे बौध्दिक आणि नैतिक शक्तीस्थान म्हणून गेल्या १५८ वर्षांत भरीव कामगिरी केली आहे.सामाजिक मुल्य आणि संधींची सतत वाढणारी जबाबदारी उत्साहाने वागवत देशाला विशेषतः महाराष्ट्र आणि मुंबई शहराला उत्तम गुणवत्ता दिली आहे. मुंबई विद्यापीठाच्या ७४० सलंग्नित महाविद्यालयातून जवळपास सात लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.पारंपारिक शिक्षणाबरोबर व्यवसायाभिमूख शिक्षणाची कास धरणा-या मुंबई विद्यापीठांने व्यवसायाभिमूख अभ्यासक्रम,नाविण्यपूर्ण शिक्षणक्रम,समाज महाविद्यालय,आदर्श महाविद्यालये सुरु केले आहेत.तर विद्यापीठाच्या उपकेंद्रामध्ये रोजगाराभिमूख अभ्यासक्रमाबरोबरच पाच वर्षीय एकात्मिक अभ्यासक्रम सुरु केले आहेत.सिंधूदुर्ग,रत्नागिरी,रायगड,ठाणे,मुंबई,आणि मुंबई उपनगर या ठिकाणी मुंबई विद्यापीठामार्फत विविध शिक्षणक्रम चालविले जातात.

वर्धापन दिन व्याख्यान मालिकेच्या अनुषंगाने समाजातील सुप्रसिध्द व्यक्तींचा त्यांच्या ज्ञानाचा फायदा जास्तीत जास्त लोकांना व्हावा तसेच अधिकाअधिक लोकांना अशा व्यक्तींचे मार्गदर्शन मिळावे या अनुषंगाने ही व्याख्यानमालिका आयोजित करण्यात आली असल्याचे मा.कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी सांगितले.समाजाचे विविध प्रश्न विद्यापीठाच्या माध्यमातून सोडविण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असुन विद्यापीठ हे ज्ञानपीठ म्हणून उदयास येणार असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्ती केला.हे विद्यापीठ संशोधनावर अधिक भर देणार असून विद्यार्थ्यांना स्वावलंबानाच्या संधी उपलब्ध करुन देण्याचाही विद्यापीठाचा मानस असल्याचा त्यांनी आशावाद व्यक्त केला.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)